ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 3.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

## SPECIAL ISSUE MARCH 2023


## कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शिवाजीनगर, गढी

राष्ट्रीय चर्चासत्र

## समकालीन मराठी साहित्यातील जाणिवा

दि.१६ मार्च २०२३

भाग तीन




ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT I LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com

Chief Editor
Principal Prof.Dr.Sadashiv H. Sarkate
Editor
Prof.Ramesh B. Ringne

RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी, ता.गेवराई जि.बीड

## ''समकालीन मराठी साहित्यातील जाणिवा''

• राष्ट्रीय चर्चासत्र •

दि.१६ मार्च २०२३

भाग तीन

Chief Editor
Principal Prof. Dr. Sadashiv H. Sarkate

Editor
Prof. Ramesh B. Ringne

• Mailing Address •
Prof.Dr. Sadashiv H. Sarkate
Editor : POWER OF KNOWLEDGE
Associate Professor &Head of Dept. Marathi
Art's & Science College, Shivajinagar, Gadhi, Tq. Georai Dist. Beed-431 143 (M.S.)
Cell. No. 9420029115 / 7875827115
Email : powerofknowledge3@gmail.com

RNI No.MAHAUL03008/13/1/2012-TC

ISSN 2320-4494

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

**Special Issue March 2023**

Editorial Officer
**Kranti Publication**
Georai Dist Beed
Beed -431 127
Contact : 7875827115
**E-mail :** Sarkatelata@gmail.com

**Published By :**
Mrs. Lata Sadashiv Sarkate

**Price :** Rs. 300/-

**Advisory :-**

**Hon. Dr. Sudhir Gavhane**
Vice Chancellor M.G.M.U.
Aurangabad
& Ex.Vice Chancellor Y.C.M.U.
Nasik
& Professor of Mass
Communication
& Jornalism Dr B.A.M.U.
Aurangabad

**Hon. Dr.Pratibha Aher**
Management Council Member
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Madan Shivaji**
Ex-Management Council
Member
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Bhagwat Katare**
Ex. Director, BCUD
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Sanjay Nawale**
Head of Dept. Hindi
Dr.B.A.M.U Aurangbad

**Hon. Dr. Paralikar Kanchan**
Principal, Mahila College, Georai

**Hon. Dr. Ashok Mohekar**
Ex-Magement Council Member
Dean, Faculty of Science
Dr.B.A.M.U. Aurangabad

**EDITOR**

***Prof. Dr.Sadashiv Haribhau Sarkate***
Senate Member, Ex-Chairman-BOS in Marathi, Dr.B.A.M.U.Aurangabad
Associate Professor & Head. Dept. of Marathi, JBSPM's
Arts & Science College, Shivajinagar, Gadhi Tq. Georai Dist. Beed

**EDITOR BOAR**

**Dr. Mala Nurilmala**
Dept of Aquatic Product Technology
Faculty of Fisheries and Marine Science
Bogor Agricultural University, Indonsia

**Dr. Bharat Handibag**
Ex-Dean, Faculty of Arts
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Dhere R.M.**
Dept of Zoology
Swa Sawarkar Mahavidayala, Beed

**Dr. Vasant Biradar**
Princial, Mahatma Phule
Mahavidyalaya,Ahmedpur,Dist.Latur

**Dr.Sudhakar Shendge**
Professor of Hindi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr.D.P. Takale**
Asso Professor & Head
Dept. of Economics
L.B.S College, Partur Dist.Jalna

**Dr.Ganesh Adgaonkar**
Kalika Devi Collage
Shirur Kasar Dist.Beed

**Dr.Aparna Ashtaputre**
Dept. of Psychology,
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr. Vitthal S. Jadhav**
Dept. of Pub.Administration,
Kalikadevi College, Shirur Dist.Beed

**Dr. Kadam Mangal S.**
PG Dept of Zoology
Yeshwant Mahavidayala, Nanded

**Dr. Rajesh Karpe**
Management Council Member
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Taher H. Pathan**
Aligad Muslim university, Aligad (U.P.)

**Dr.S.D.Talekar**
Professor, Dept. of Commerce
L.B.S College, Partur Dist.Jalna

**Dr.S.R.Takale**
Principel, Sant Sawatamali, College,
Phulambri Dist. Aurangabad

**Dr.Bharat Khandare**
Principal, Swami Vivekanand College
Mantha Dist. Jalna

**Dr.Vishwas Kadam**
Principal, JBSPM's Arts & Science
College, Gadhi Tq.Georai Dist. Beed

**Dr. Fulchand Salampure**
Management Council Member
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr.Madhukar Jadhav**
Shri. Vyankatesh mahavidyalya,
Deulgaonraja, Buldana

**REFERECS**

**Dr. Shahaji Gaikwad**
Ex-Chairman BOS in English
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Dr. Santos Chavan**
Shivchhatrapati College
Pachod, Dist. Aurangbad

**Dr.Vishwas Patil**
Radha Nagari College,Radha
Nagari, Dist. Kolhapur

**Dr. Shivaji Yadhav**
Shivchhatrapati College,
Pachod, Dist. Aurangbad

**Dr. Dilip Khairnar**
Professor, Sociology
Devgiri College, Aurangabad

**Dr. Laxmikant Shinde**
Asst Professor
JES College, Jalna

**MANGING EDITORS**

**Mr. Ramesh Ringne**
**Prof. Bapu Ghokshe**
**Mr. Shivaji Kakade**
**Dr. Shakur Shaikh Husain**

**Mr. Vinod Kirdak**
**Dr. Datta Tangalwad**
**Mr. Kalandar Pathan**
**Dr. Suhas Morale**
**Dr. Baliram Katare**

**Asst.Prof.Mohan Kalkute**
**Dr. Adgaonkar Ganesh**
**Dr. Santosh Chavan**
**Dr. Rajkumar Yallawad**

# अनुक्रमणिका (Index)


| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| १. | समकालीन मराठीतील धार्मिक साहित्य आणि २१ व्या शतकातील जाणिवा | प्राचार्य डॉ. श्री चंद्रशेखर आत्माराम भगत | 01 |
| २. | समकालीन मराठी साहित्य आणि ग्रामीण जाणिवा | प्रा.दिप्ती लक्ष्मण निकाळजे | 04 |
| ३. | अलवार क्षणांची भावव्याकूळ काव्यात्म वीण | प्रा. डॉ. दत्तात्रय प्र. डुंबरे | 08 |
| ४. | अवकाळी विळखा मधील समकालीन ग्रामीण जाणीव | डॉ.कमल केशव कांबळे | 11 |
| ५. | एक प्रयोगशील कथाकार- रंगनाथ पठारे | प्रा. केशव विठ्ठल कोकाटे<br>प्राचार्य डॉ.नागनाथ पाटील | 14 |
| ६. | सुहासिनी इर्लेकर यांच्या कवितेतील प्रेमानुभव [ विशेष संदर्भ : 'छांदस' आणि 'आल्या जुळून तारा' ] | डॉ महादेव अंगद जगताप | 18 |
| ७. | बारोमास :समकालीन ग्रामीण वास्तवाचा वेध घेणारी कादंबरी | डॉ .मीनाक्षी भोयर | 22 |
| ८. | समकालीन आदिवासी कवितेतील क्रांतीसन्मुख जीवन जाणीवा : एक आकलन | अजय श्रीराम मुरमुरे | 28 |
| ९. | साहित्य आणि सामाजिक जाणीव | प्रा. डॉ. नवीन केशवराव सोळंके | 31 |
| १०. | समकालीन मराठी साहित्य आणि आयदान आत्मकथन | नेहा रतन बनसोडे | 36 |
| ११. | 'सेलझाडा'- समकालीन ग्रामीण साहित्य प्रवाहातील कादंबरीचे चिकित्सक अभ्यास | प्रा. पद्मा वि. नागदेवे | 39 |
| १२. | सामाजिक बांधिलकीचा व्यापक पट 'शिवार ते संसद' | प्रा.फरताडे गणेश मनोहर | 44 |
| १३. | समकालीन मराठी कथा | डॉ. राखी मंगेश जाधव | 48 |
| १४. | समकालीन मुळांचा कसकसून शोध घ्यायला लावणारी कांदबरी - 'जोहार' | प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे | 52 |
| १५. | समकालीन बाल कादंबरी: एक दृष्टिक्षेप | श्री.सदाशिव गंगाधर चुकेवाड | 55 |
| १६. | *आदिवासी कविते मधील सामाजिक जाणिवा* | डॉ . संजय रमेश मेस्त्री | 59 |
| १७. | *समकालीन मराठी साहित्य आणि ग्रामीण जाणिवा* | सुभाष रामलिंगप्पा वेरागकर | 64 |
| १८. | समकालीन साहित्यातील समीक्षा पध्दती | सुनिल दत्तु कल्याणकर | 68 |
| १९. | दलित रंगभूमी आणि आंबेडकरी चळवळीतील स्थित्यंतराचा समिक्षात्मक दृष्टिकोन : | डॉ. बाळासाहेब बाबुराव लिहिणार | 72 |
| २०. | 'समकालीन मराठी कथा' | प्रा.महारुद्र जगताप | 77 |
| २१. | बहिणाबाईची गाणी साध्या बोलीतलं तत्त्वज्ञान | डॉ.सुनिता अंबादास बारड | 81 |
| २२. | निवडक साहित्यकृतीमधील स्त्रीप्रतिमा 'शामची आई' व 'बहिणाबाईची गाणी' या विशेष संदर्भात | डॉ. सुरेखा सीताराम बनकर | 85 |

# समकालीन मुळांचा कसकसून शोध घ्यायला लावणारी कांदबरी - 'जोहार'

प्रा. रमेश बाबासाहेब शिंगणे
कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी

प्रस्तावना -

मराठी साहित्यात कादंबरी साहित्य प्रवाहाचे वेगळेपण डोळ्यात भरणारे आहे. दृगनिक विषयाला एका निश्चित आशयसूत्रात अभिव्यक्त करण्याची 'कांदबरी' ही कारागिरी साहित्यिक, कादंबरीकार व्यापकपणे चित्रीत करत असतो. हा पट अनेक काळ, आवर्तने, परिवर्तने रेखाटत चालत असतो. तत्कालीन परिस्थिती आणि काळाचे संदर्भ घेऊनच हरएक साहित्यिक कलाकृती निर्माण होत असते. "जोहार' ही सुशील धमकटे यांची नोव्हेंबर २०१५ मध्ये प्रकाशित झालेली कादंबरी'१ विचार, आचार अन् विवेकाला अंतर्मुख करणारी, मनावर घाव घालणारी, परंपरेच्या शोधात नव्याचा बोध करून देणारी ही कादंबरी आहे. ती वास्तवाची दिशादर्शक रेखी करून समकाळाच्या मुळाचा शोध घेणारी महत्त्वपुर्ण कादंबरी ठरते. शहरी-ग्रामीण या सीमावर्ती परिघावर भारतीय म्हणून असणारा देशीवाद अधिक प्रगल्भपणे मांडणारा आणि जगणारा हा 'जोहार'चा चिंतन व्यवहार मराठी कादंबरीचे स्वरूप आणि प्रारूप विस्तारणारा ठरतो. म्हणून समकालीन कादंबरी वांङ्मयात 'जोहार'चे महत्त्व आणखी वाढत जाते.

'जोहार' एक आकलन -

सत्य प्रकर्षाने मांडणारी सुशील धमकटे यांची 'जोहार' ही कांदबरी या काळाचे सशक्त भान देणारी म्हणून महत्वपुर्ण ठरणारी आहे. संवादाच्या पाताळीवरला हा 'जोहार' विचाराच्या, आचाराच्या बाबतीतील भेद स्पष्टपणे मांडत, सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि शैक्षणिक व्यवस्थेतील व्यवहारिक, वर्तनविषयक गोंधळही ही सशक्तपणे रेखाटते. 'जोहार' ही तेवढ्यावरच थांबत नाही, तर ज्यायोगे हा गुंता झालेला आहे त्या मुळांना आपल्या पुढ्यात ठेवून विचार करायला भाग पाडणारी कलाकृती ठरते. "हे एका परीने ऐतिहासिकदृष्ट्या महत्वाचे काम सुशील धमकटे यांनी केले आहे.एकूण कृषिसंसकृतीचे भले चिंतणारी, आज शेतीस आलेल्या अवकळेस इथली व्यवस्था कशी जबाबदार आहे, याकडे शेतकऱ्यांच्या शिक्षित मुलांना त्यांच्या मूलभूत प्रश्नांकडे डोळसपणे बघायला लावणारी ही कादंबरी आहे." २

कृषी परंपरा आमच्या जाणिवेत, नेणिवेतसुद्धा पिढ्यानपिढ्या मुरलेली आहे. हे अधोरेखित करत, पण पुरती विस्कटलेली ही शेतीची घडी सध्यातरी घुसमटीशिवाय काहीच देऊ शकत नाही. हे ही वास्तव मांडणारी 'जोहार' ही कांदबरी आहे. सुशील धसकटे यांची 'जोहार' आपल्या मुळांच्या ओढीने आतून आवाज देते. तत्त्व, निष्ठा ही पुस्तकातून काढून मल्हारच्या व्यवहारीक स्वगतातून आपल्या समोर ठेवते.

'जोहार' वाचकाला जीवनाच्या, व्यवस्थेच्या अशा काही वळणावर आणून उभी करते की, मन, मेंदुला कार्यप्रवण केल्याशिवाय गत्यंतर उरतच नाही. आणि मग हात सळसळून उठतात आपल्या मुळ

तत्त्वाचा शोध घ्यायला. विलास सोनवणे म्हणतात 'ही कादंबरी शेवटच्या पानापर्यंत शहर आणि ग्रामीण अशी नैसर्गिकपणे हिंदकळत जाते. मूल्ये संपूर्णतः नष्ट होण्याचा संघर्ष जोहारमध्ये आलेला आहे. म्हणून अशा अनेक अर्थाने ही कादंबरी मला महत्त्वाची वाटते.'३ शहराच्या भव्यदिव्यतेत असणाऱ्या वर्तन, विचारांच्या वकालतेलाही ती हादरे देतांना दिसते. सिजारी बुरखे फाडून उघड करते त्यातल्या रितेपणाला. सोयीच्या गोष्टी सोयीने घ्यायला लावल्या की कैक पिढ्या आपोआप खपतात. हे षड्यंत्र कुणब्यांना का नाही कळलं, अन् ज्यांना कळले ते फुलेही आपल्यापासून दूरच ठेवले. असा संरजामीपणा ला हादरे देणारा विचार मल्हारच्या विचार मंथनातून घुसळून वर येऊ पाहतो. सोरख, केश्या, सुऱ्या आणि पक्या सुद्धा अशी सगळीच्या सगळी जण अगदीच सहज भेटतात जीवनाच्या वाटचालीत, रेटत न्यायचा प्रयत्न करतात आपल्या वृत्तीला, निष्ठेला आणि जगण्यालाही, आपआपल्या भूमिकांशी ठाम राहून. भोसले मास्तरांसारखा एखादाच माणूस भेटतो जो धडपडतोय पुस्तकी तत्त्वज्ञानाला रंग, रूप, अन् आकार देण्यासाठी. ही या कांदबरीची शक्तिस्थान आहेत.

नवे स्वीकारा पण जुने सर्वच टाकाऊ आहे, असे नाही, हे ही नमुद करून 'जोहार' चक्रधर-ज्ञानेश्वर, नामदेव-चोखोबा, तुकाराम-शिवाजी, शाहू-फुले, आणि गांधी-आंबेडकर यांच्या विचारांची समाज हिताशी सांगड घालतांना दिसते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे कसं काय दुर्लक्षित राहिले, हा ही प्रश्न या कादंबरीतून अपसूक पुढे येतो. म्हणूनच तिची नैतिक उंची वाढलेली सतत जाणवत राहते. धमकटेंची वैचारिक परिपक्वता आणखीच ठसठशीत वाटायला लागते, जेव्हा 'आवडं' सारखी स्त्री ताठर आणि कणखर पणे उभी राहते. 'आई' जी निगुतीन संसार करत करतच परिस्थितीवर स्वार होऊन चांगुलपणालाच प्राधान्य देते. तात्यांच्या संघर्षाला नैतिक आणि व्यवहारीकतेची जोड आहे. ही माणसं ढळत नाहीत, पळत नाहीत. हाज खरा जीवनवाद होय, जो समरसपणे यातल्या प्रत्येक व्यक्तिचित्रातून प्रगट होतो.

आजच्या शिक्षणाची, व्यवस्थेची, कशी वाताहात झालेली आहे. हे चित्रीत करतांना एक परखड संवेदनशीलता दिसून येत राहते सारखी. बाजाराला शोभेल, टिकेल आणि नाव मिळवून देईल अशा निर्मितीच्या चोख तयारीच्या कारखान्यात काय हाती उरणार आहे. ही खंत मात्र मल्हारच्या डोक्यात सारखी वळवळताना दिसते. म्हणून घोळक्या घोळक्याने येणारी सामाजिकता, जातियता आणि राजकारणही काय दिशा दाखवणार ह्या समुहाला. हा प्रश्न उभा राहतो तो मुंग्यांच्या सामुहिक डसण्यातून. तेव्हा तर वाद होत राहतात, आपल्या वैचारिक गोंधळाशी. म्हणून तर मल्हारला स्वप्नातही पांडुरंगशी, शेतीनिष्ठता जपणाऱ्यांशी (फुल्यांशी) संवाद करावा वाटतो. आणि हा संवादच समाजात रुतून बसलेल्या प्रवृत्तीवर घाव घालू शकतो. हा विश्वास सुद्धा ही कांदबरी देते. आणि शेवटी शेवटी येणारे महानुभावीय निरूपण एकप्रकारे उत्सर्जित करत राहते अनुभवाला, दिशाही दाखवत जाते परिस्थितीला. पण महानुभावीय परखडता आणि ताठरता घेऊन आलेली ही व्यवस्थेच्या विरोधातली मांडणी एकतर्फी

वाटू नये म्हणजे झालं. शहरांचे विकासाच्या बाबतीत कौतुकच, पण खेडी दुर्लक्षित रहायला नको, तसाच निसर्गही.

शहर, खेडं, राजकारण, विद्यापीठ, साहित्य असं कोणतही क्षेत्र जसं आहे तसंच इथं आलय. शासन आणि अध्यासने दोन्ही पोकळच असतात याला पुराव्याची गरज लागत नाही. तसंच गावागावच्या वाढत्या जातीयतेला आजकाल जशी कारणं लागत नाहीत, तशी तत्त्व देखील. आणि हेच ही कादंबरी "या परंपरेतील पुर्वसुरींविषयी कृतज्ञता व्यक्त करणारी आहे. जोहार शब्द लाचारी दर्शवणारा नव्हे, तर साठहजार वर्षांपासून अस्तित्वात आहे. चक्रधरांपासून तर चोखामेळांपर्यंत ज्यांनी माणसा माणसांतील समानतेच्या धाग्याला पुष्टी दिली. आणि निखळ माणूसपणाला आदर व्यक्त केला."४ असा गावगाडा ह्या तर भावनुभावासह व्यक्त झाला. 'जोहार' ही कादंबरी मुळातल्या ज्या चांगल्या गोष्टी आहेत त्या बिनदिक्कत स्वीकारायला लावते. दोष देतेही पण जबाबदारीही घ्यायला लावते. अन् म्हणून म्हणावे वाटते जोहार.. वाचकहो जोहार...!, प्रवाहात उतरून बघण्यापेक्षा, त्याचा रोख कसा आहे हे ओळखून बोलणाऱ्या मल्हारला जोहार.. जोहार मल्हार... जोहार....!

समारोप -

समाजाचा घटक म्हणून असणारा सुशील धसकटे यांच्यासारखा साहित्यिक मल्हारच्या स्वगतातून समाजातील स्थित्यांतरे टिपतो. तळागाळातून आलेला तरूण आत्मविश्वासाने लिहितो बोलतो. परिस्थितीशी घट्ट जुळलेली नाळ सामान्याजनाशी व जीवनाशी आणखी पक्की ठरवून घेतो आणि अत्यंतिक गांभीर्याने साहित्य क्षेत्रात पाऊल ठेवतो. असच काहीसं सुशील धसकटे यांच्याबाबतीत म्हणावे लागेल. वर्तमानाशी थेट नाते सांगून वस्तुनिष्ठ मते मांडत, ते तेवढ्यावरच न थांबता आपल्याच समकालीन मुळांचा कसकसून शोध देखील घ्यायला लावतात.

संदर्भ-

१) सुशील धसकटे, जोहार, अक्षरवांङ्मय प्रकाशन पुणे, दुसरी आवृत्ती १४ फेब्रुवारी २०१९
२) प्रा. शेषेराव मोहिते, अक्षरनामा.
३) विलास सोनवणे, मलपृष्ठ, जोहार.
४) प्रा. शेषेराव मोहिते, अक्षरनामा.